# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

## **इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१६-१७**

## **मुख्याध्यापक, विद्यार्थी व पालक यांना सूचना**

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये इयत्ता ११ वी प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. याबाबत विद्यार्थी व पालक यांच्यात जाणिव जागृती करण्यासाठी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी चे इयत्ता ११ वी चे कला, विज्ञान व वाणिज्य शाखेचे सर्व प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होतील.

२) किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रम (एमसीव्हीसी), होम सायन्स, उर्दु, तेलगु, गुजराथी, हिंदी माध्यमाचे तसेच तांत्रिक कनिष्ठ महाविद्यालयातील व रात्र शाळा कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश ऑनलाईन पध्दतीने न होता संबधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावर होतील.

३) इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश नियंत्रण व नियोजनासाठी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राचे खालील प्रमाणे एकुण ०९ झोन केलेले आहेत.

i) पुणे शहर विभाग ii) कोथरुड , कर्वेनगर iii) स्वारगेट, पर्वती, धनकवडी iv) सिंहगड रोड v) कॅम्प, येरवडा vi) हडपसर vii) शिवाजीनगर, औंध,पाषाण vii) पिंपरी भोसरी ix) चिंचवड, निगडी

४) विद्यार्थ्यांने इनहाऊस, अल्पसंख्यांक, व्यवस्थापन किंवा केंद्रीय प्रवेश पध्दतीने यापैकी कोणताही प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे. म्हणजेच इयत्ता ११ वी प्रवेशासाठीच्या वेबसाईटवर प्रवेश अर्जाचा भाग-१ भरणे **सर्व विद्यार्थ्यांसाठी** अनिवार्य आहे ही बाब पालकांना माहित करुन द्यावी. एप्रिल २०१६ च्या शेवटच्या आठवडयात याबाबतचे वेळापत्रक सूचना फलकावर लावले जाईल असे पालकांना सुचित करावे.

५) **दि. २३ मार्च २०१६ ते ३१ मार्च २०१६** या कालावधीत आपल्या शाळेतील शिक्षक पालक संघामार्फत इयत्ता १० वी तील सर्व विद्यार्थी व पालकांची सभा आयोजित करावी. सभेस उपस्थित पालकांच्या स्वाक्ष-या घेण्यात याव्यात व सदर सभेचा अहवाल खालील तक्त्याप्रमाणे आपल्या संपर्क शाळेकडे सादर करावा.

६)मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतून इयत्ता १० वी परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्जाचा भाग-१ भरल्याची खात्री करावी, विद्यार्थ्यांस इ. ११ वी साठी प्रवेश घ्यावयाचा नसल्यास त्यासंबधी त्याच्या पालकांच्या स्वाक्षरीने लेखी निवेदन घेऊन दप्तरी ठेवावे.

७) विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग-२ (ऑप्शन फॉर्म/पसंतीक्रम) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इ. १० वी च्या ऑनलाईन निकालानंतर भरावयाचा आहे. त्याबाबतचे वेळापत्रक वेळोवेळी जाहिर केले जाईल.

८) सदर प्रवेश प्रक्रियेसाठी झोन निहाय संपर्क शाळा खालीलप्रमाणे राहतील.

| अ.क्र. | झोन चे नांव | झोन क्रमांक | संपर्क शाळा |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | १ | एच.एच.सी. पी. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, नारायण पेठ लक्ष्मी रोड पुणे-३० |
| २ | कोथरुड, कर्वेनगर | २ | डॉ. शामराव कलमाडी हायस्कूल व ज्युनिअर कॉल्ेज एरंडवणा, गणेश नगर पुणे-३८ |
| ३ | स्वारगेट, पर्वती, धनकवडी | ३ | कर्मवीर भाऊराव पाटील विद्या मंदिर व ज्युनिअर कॉल्ेज पुणे सातारा रोड, धनकवडी पुणे-४३ |
| ४ | सिंहगड रोड | ४ | ज्ञानगंगा ज्युनिअर कॉलेज, विश्रांतीनगर, हिंगणे खुर्द , विठ्ठलवाडी, सिंहगड रोड पुणे-४१ |
| ५ | कॅम्प, येरवडा | ५ | कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे ज्युनिअर कॉलेज बाबाजान चौक , कॅम्प पुणे-१ |
| ६ | हडपसर | ६ | आकुताई कल्याणी गर्ल्स ज्युनिअर कॉलेज माळवाडी, हडपसर, पुणे-२८ |
| ७ | शिवाजीनगर, औंध, पाषाण | ७ | भारत इंग्लिश स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉल्ेज शिवाजीनगर पुणे-५ |
| ८ | पिंपरी, भोसरी | ८ | महात्मा फुले महाविद्यालय, नवमहाराष्ट्र विद्यालयाजवळ, पिंपरी गांव पुणे-१७ |
| ९ | चिंचवड, निगडी | ९ | मॉडर्न हायस्कूल व ज्युनिअर कॉल्ेज, यमुनानगर, निगडी, सेक्टर नं-२१ पुणे-४४ |

९) सर्व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांनी त्यांच्या शाळेतून इयत्ता १० वी साठी प्रविष्ट झालेल्या नियमित, पुनर्परीक्षार्थी व खाजगी विद्यार्थ्यांची (१७ नं चा फॉर्म भरलेले विद्यार्थी ) संख्या विचारात घेवून वर नमुद संपर्क शाळेकडे **दि.१०.०४.२०१६** पर्यंत माहितीपुस्तिकेची मागणी पत्राद्वारे नोंदवावी.

१०) माहिती पुस्तिका वितरण करण्यापूर्वी प्रवेश प्रक्रियेसंबधी सविस्तर सूचना व कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात येतील. तसेच झोननिहाय मुख्याध्यापक व तंत्र सहाय्यक यांचे प्रशिक्षण , पालक व विद्यार्थ्यांसाठी उद्‌बोधन वर्ग घेण्यात येतील.

११) विद्यार्थी व पालकांनी पुढील माध्यमातून इयत्ता ११ वी च्या प्रवेश प्रक्रियेबाबत सूचना पाहण्याचे मार्गदर्शन आपल्या स्तरावरुन करण्यात यावे.

अ) शिक्षण उपसंचालक कार्यालय वेबसाईट **www.dydepune.com**

ब) ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया करणा-या एजन्सीची वेबसाईट **http://pune.fyjc.org.in** (सुरु झाल्यानंतर)

क) स्थानिक वर्तमानपत्रातील इ. ११ वी प्रवेशा संदर्भातील बातम्या/माहिती व इतर प्रसार माध्यमे.

ड) शाळेची वेबसाईट (असल्यास)

इ) शाळेचा दूरध्वनी क्रमांक अथवा प्रवेशासाठी स्थापन केलेला कक्ष अथवा जबाबदार शिक्षक किंवा कर्मचारी

१२) माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांवर आपल्या शाळेतील इयत्ता १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांचे इयत्ता ११ वी च्या प्रवेशासाठी ऑनलाईन फॉर्म (भाग-१) भरण्याची जबाबदारी असल्यामुळे ते काम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व नियोजन करावे.

१३) शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे कार्यालयाच्या **www.dydepune.com** या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी. दिलेल्या सूचनांचे काटेकारेपणे पालन करावे.

## इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश २०१६-१७ चे संभाव्य वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया संदर्भात सहविचार सभा व मार्गदर्शन | दि.२२ मार्च २०१६ सकाळी ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत<br>(स्थळः- मुक्तांगण हायस्कूल, सहकार नगर पुणे-९) |
| २ | मुख्याध्यापकांनी त्यांच्या शाळेतील मार्च २०१६ मध्ये इ. १० वी च्या परीक्षेस बसलेल्या विद्यार्थी व पालक यांची मार्गदर्शन सभा घेणे. | दि. २३ मार्च २०१६ ते ३१ मार्च २०१६<br>(शाळा पातळीवर) |
| ३ | माहितीपुस्तिकांची मागणी - मुख्याध्यापकांनी संपर्क शाळांप्रमुखांकडे माहिती पुस्तिकांची मागणी संख्या निवेदन सादर करणे. | दि. २३ मार्च २०१६ ते ३१ मार्च २०१६. |
| ४ | संपर्क शाळाप्रमुखांनी आप-आपल्या केंद्रातील शाळांची मागणी एकत्र करुन शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे केंद्राचे मागणी पत्र सादर करणे. | दि. ०१ एप्रिल २०१६ ते ०७ एप्रिल २०१६. |
| ५ | माहितीपुस्तिका वितरण - प्रत्येक मुख्याध्यापकाने आप-आपल्या शाळेतुन इयत्ता १० वी च्या परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांना माहिती पुस्तिका वितरित करणे | दि. १५ एप्रिल २०१६ ते २५ एप्रिल २०१६. |
| ६ | मुख्याध्यापक, तंत्रसहाय्यक व सर्व संबधित यंत्रणा यांचे प्रशिक्षण वर्ग | दि. १५ एप्रिल २०१६ ते २० एप्रिल २०१६. |
| ७ | पालक व विद्यार्थी यांच्यासाठी झोन पातळीवर उद्‌बोधन वर्ग घेणे (दिनांक, वेळ, ठिकाण संकेतस्थळावर प्रसिध्द् केले जातील). | दि. २० एप्रिल २०१६ ते ३० एप्रिल २०१६. |
| ८ | इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्जातील भाग-१ शाळास्तरावर भरुन आरक्षित विद्यार्थ्यांचे अर्ज मुख्याध्यापकांनी तपासून ॲप्रुव्ह करणे व भाग-१ सर्व विद्यार्थ्यांचा ऑनलाईन सबमिट करणे (आरक्षित व खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांसह) | दि. ०२ मे २०१६ ते इयत्ता १० वी चा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा (एसएससी बोर्ड/स्टेट बोर्ड ) निकाल लागेपर्यंत |
| ९ | विद्यार्थ्यांनी भाग-२ (पसंतीक्रम) भरणे व सबमिट करणे. (भाग-१ व भाग-२ सह) | इयत्ता १० वी चा बोर्डाचा ऑनलाईन निकाल लागल्यानंतर (१० दिवसांच्या आत) नियोजित वेळापत्रकाप्रमाणे |

**(सूचना :- यापुढील प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक नंतर जाहिर केले जाईल.)**

सदरचे सूचना पत्रक शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांच्या **www.dydepune.com** या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

**(मिनाक्षी राऊत)**
**सचिव**
**इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती**
**तथा**
सहा.शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१